# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:07.08.2025** **वार:गुरुवार**

1. 'कर्तव्य भवन' ही कोट्यवधी देशवासीयांची स्वप्नं साकार करण्याची तपोभूमी-पंतप्रधानांचं प्रेरणापूर्ण वक्तव्य
2. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढाव्यामध्ये पूर्वीचेच व्याजदर, रेपोदर कायम
3. 'मराठवाड्यातल्या पुढच्या पिढीला दुष्काळ पहावा लागणार नाही', मुख्यमंत्र्यांची ग्वाही
4. राज्यातील 5 ज्योतिर्लिंग विकास आराखड्यांच्या अंमलबजावणीसाठी वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांची नियुक्ती आणि
5. पुणे विमानतळावर सीमाशुल्क विभागाच्या कारवाईत सहा कोटी रुपये किंमतीचे अंमली पदार्थ जप्त

**कर्तव्य भवन-मोदी**

'कर्तव्य भवन' ही केवळ इमारत नाही, तर कोट्यवधी देशवासीयांची स्वप्नं साकार करण्याची ती तपोभूमी आहे. याच भवनामध्ये आता विकसित भारताचे नीतीनिर्णय घेतले जातील, अमृत काळामध्ये राष्ट्राची भविष्यातील दिशा निश्चित केली जातील, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते काल संध्याकाळी नव्यानं राष्ट्रार्पण करण्यात आलेल्या कर्तव्य भवनमधून देशवासीयांशी संवाद साधत होते. यावेळी बोलताना पंतप्रधान म्हणाले.....

**कर्तव्य ही आरंभ है, कर्तव्य ही प्रारब्ध है। करुणा और कर्मठता के स्नेह सूत्र में बंधा कर्म, वही तो है-कर्तव्य। सपनों का साथ है- कर्तव्य, संकल्पों की आस है- कर्तव्य, परिश्रम की पराकाष्ठा है- कर्तव्य, हर जीवन में ज्योत जला दे, वो इच्छाशक्ति है- कर्तव्य। करोड़ों देशवासियों के अधिकारों की रक्षा का आधार है- कर्तव्य, मां भारती की प्राण-ऊर्जा का ध्वजवाहक है- कर्तव्य, नागरिक देवो भव: के मंत्र का जाप है- कर्तव्य, राष्ट्र के प्रति भक्ति भाव से किया हर कार्य है- कर्तव्य।**

तत्पूर्वी काल सकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्लीतील कर्तव्यपथावर बांधण्यात आलेल्या कर्तव्य भवनाचं उद्घाटन झालं. सेंट्रल व्हिस्टा इमारत संकुलाचा विस्तार करून कर्तव्य भवनाची इमारत उभारण्यात आली आहे. प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता आणि गतिमानता आणण्यासाठी बांधण्यात येत असलेल्या केंद्रीय सचिवालयांच्या इमारतींमधली ही पहिली इमारत आहे. या इमारतीत गृह, परराष्ट्र व्यवहार, ग्रामीण विकास, एमएसएमइ, तेल आणि नैसर्गिक वायू यासारख्या काही प्रमुख मंत्रालयांची कार्यालयं असतील. स्वातंत्र्योत्तर काळापासून आजतागायत भाड्याच्या जागेत कार्यरत असलेल्या मंत्रालयांना यामुळे स्वतःची जागा मिळणार असून दरवर्षी भाड्यासाठी होणाऱ्या दीड हजार कोटी रुपये खर्चात त्यामुळे बचत होणार आहे.

**रिझर्व्ह बँक**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं नुकत्याच जाहीर केलेल्या पतधोरण आढाव्यामध्ये व्याजदर 'जैसे थे' ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळं रेपो दर साडेपाच टक्क्यांवर कायम राहणार आहे. याशिवाय इतरही दर पूर्वीप्रमाणेच राहणार आहेत. बँकेच्या पतधोरण आढावा समितीची बैठक नुकतीच मुंबईमध्ये पार पडली. त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला. चालू आर्थिक वर्षात महागाई दर आणखी कमी होऊन तो 3 पूर्णांक 1 दशांश टक्के राहील, असं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आढावा बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं. जूनमध्ये वर्तवलेल्या अंदाजात हा दर 3 पूर्णांक 7 दशांश टक्के राहील, असं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं होतं. खाद्यपदार्थांच्या दरात होत असलेली घसरण, शेती क्षेत्रात झालेल्या सुधारणा यामुळं महागाई दराचा अंदाज कमी केल्याचं मल्होत्रा म्हणाले. आर्थिक वृद्धी दर साडेसहा टक्क्यांवर कायम राहील, असंही त्यांनी सांगितलं.

बँकेमार्फत मिळणाऱ्या सुविधा अधिक सुलभ रीतीनं उपलब्ध व्हाव्यात म्हणून बँक काही उपक्रम आयोजित करणार आहे. जुलै ते सप्टेंबर दरम्यान बँकेतर्फे सर्व ग्रामपंचायतीमध्ये मेळावे आयोजित केले जाणार आहेत. यात बँक खाती उघडणं, पुन्हा केवायसी करणे, विमा आणि निवृत्तीवेतन योजना यासारख्या सुविधा मिळतील, अशी माहिती गव्हर्नर मल्होत्रा यांनी दिली. खाते धारकाचा मृत्यू झाल्यावर त्यांच्या बँकेतल्या लॉकरमधल्या वस्तू वारसांना सुलभरितीने काढता याव्यात याची प्रक्रीया आणखी सुलभ आणि सोपी करणार असल्याचं ते म्हणाले.

**मुख्यमंत्री**

'मराठवाड्यातल्या पुढच्या पिढीला दुष्काळ पहावा लागणार नाही', अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या वैजापूर तालुक्यात देवगाव शनी इथं योगीराज सदगुरु श्री गंगागिरीजी महाराज यांच्या 178 व्या अखंड हरिनाम सप्ताहात बोलत होते. समुद्रात वाहून जाणारं पाणी गोदावरी खोऱ्यात वळवण्याचं काम याच वर्षात सुरू होईल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. या परिसराचा विकास आराखडा मंजूर करण्याचं आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी दिलं, ते म्हणाले....

**शनी देवगाव बंधारा हा एक अत्यंत महत्वाचा बंधारा आहे. मला याची कल्पना आहे की हा बंधारा झाला तर आमच्या शेतकऱ्यांचंही मोठं कल्याण होणार आहे आणि म्हणून आजच तुम्हाला वचन देऊन जातो शनी देवगाव बंधारा आम्ही करणार म्हणजे करणार.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना काल श्रीक्षेत्र देवगांव इथं अखंड हरिनाम सप्ताहादरम्यान लाडक्या बहिणींनी राखी बांधली. या जिव्हाळ्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी सर्व बहिणींचे आभार मानले.

**नियुक्ती**

बारा ज्योतिर्लिंगापैकी महाराष्ट्रातल्या पाच ज्योतिर्लिंगांच्या विकास आराखड्यांची प्रभावी आणि वेगवान अंमलबजावणी व्हावी, यासाठी मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार पाच वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हे अधिकारी संबंधित ज्योतिर्लिंगांच्या विकास आराखड्यांतील कामांचा नियमितपणे आढावा घेऊन, त्याबाबतचा अहवाल मुख्यमंत्र्यांना सादर करतील. भीमाशंकरसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांची तर त्र्यंबकेश्वरसाठी वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उर्वरित तीन ज्योतिर्लिंगांपैकी घृष्णेश्र्वरसाठी उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, औंढा नागनाथसाठी वित्त विभागाच्या प्रधान सचिव रिचा बागला तर परळी वैजनाथसाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळज यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**महादेवी वनतारा**

कोल्हापूर जिल्ह्यातल्या नांदणी मठातल्या महादेवी हत्तिणीसंदर्भात वनतारा संस्थेच्या पथकाशी काल सविस्तर चर्चा केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. महादेवीला मठात परत आणण्यासाठी राज्य सरकारतर्फे दाखल करण्यात येणाऱ्या सर्वोच्च न्यायालयातल्या पुनर्विचार याचिकेत वनतारा पक्षकार म्हणून सहभागी व्हायला तयार असल्याचंही फडणवीस यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. राज्य सरकारच्या वन विभागाने निवडलेल्या नांदणीजवळच्या जागेवर महादेवीसाठी पुनर्वसन केंद्र बांधण्याची तयारीही वनताराच्या पथकानं दर्शवल्याचं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं आहे.

**संसद**

व्यापारी नौवहन विधेयक 2024 काल लोकसभेमध्ये मंजूर करण्यात आलं. या विधेयकात 1958 च्या व्यापारी नौवहन कायद्यातल्या आंतरराष्ट्रीय सागरी करारांमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. भारतीय नौवहन क्षेत्राचा विकास आणि

भारताच्या व्यवसायिक सागरी क्षेत्राच्या सर्वोत्तम पद्धतीन देखभाल सुनिश्चित करणं, हा या विधेयकाचा उद्देश आहे. दरम्यान, विरोधी पक्षानं बिहारमधील मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनर्तपासणीसह इतर वेगवेगळ्या मुद्द्यांवरून केलेल्या घोषणाबाजीनंतर संसदेच्या दोन्ही सदनांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. त्यापूर्वी लोकसभेत सकाळी कामकाज सुरू होताच अध्यक्ष ओम बिर्ला यांनी हिरोशिमा दिनाच्या पार्श्वभूमीवर आदरांजलीचा प्रस्ताव मांडला. सदनानं या अणुबॉम्ब हल्ल्यातल्या पीडितांना आदरांजली अर्पण केली. राज्यसभेत सदनाचे माजी सदस्य, माजी राज्यपाल दिवंगत सत्यपाल मलिक यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

**<u>शिंदे दिल्ली</u>**

उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत शिवसेनेचा भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला भक्कम पाठिंबा असल्याचं शिवसेनेचे मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. शिंदे यांनी शिवसेनेच्या सर्व खासदारांसह काल नवी दिल्ली इथं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली, त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

**<u>वडेट्टीवार</u>**

राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व्हीव्हीपॅटशिवाय घेऊ नये, ही यंत्र उपलब्ध नसतील तर मतपत्रिकेवर निवडणुका घ्याव्यात, अशी मागणी काँग्रेस पक्षाचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. ते काल मुंबई इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. निवडणुका पारदर्शक पद्धतीनं होण्यासाठी व्हीव्हीपॅटची आवश्यकता असल्याचं वडेट्टीवार म्हणाले.

**<u>उत्तराखंड ढगफुटी</u>**

उत्तराखंडात भीषण ढगफुटीमुळे आलेल्या आपत्तीत महाराष्ट्रातले 51 पर्यटक नागरिक सुरक्षित आहेत. राज्य आपत्कालीन कार्य केंद्रानं ही माहिती दिली. दरम्यान, या ठिकाणी अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांना राज्यात सुखरूप परत आणण्यासाठी राज्य सरकार युद्धपातळीवर प्रयत्न करत आहे.

**<u>वृक्षलागवड</u>**

लातूर जिल्ह्यात वृक्ष लागवडीला गती देण्यासाठी दोन दिवसीय विशेष मोहीम राबविली जाणार आहे. स्वातंत्र्यदिनी जिल्ह्यात व्यापक स्वरूपात वृक्षारोपणासाठी 'भव्य मोहीम' आयोजित केली जाईल. तसंच गतवर्षीप्रमाणे यावर्षीही 17 ऑगस्ट रोजी गंजगोलाई परिसरात आणि प्रत्येक तालुक्यामध्ये 'माझं लातूर, हरित लातूर' अंतर्गत 'लातूर हरितोत्सव' साजरा होईल. या दोन्ही उपक्रमांमध्ये नागरिक, पर्यावरणप्रेमी संघटना आणि स्वयंसेवी संस्थांनी सहभागी होण्याचं आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केलं आहे.

**<u>अंमली पदार्थ</u>**

सीमाशुल्क विभागानं केलेल्या कारवाईत पुणे विमानतळावर बँकॉकवरून आलेल्या विमानातून मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ जप्त करण्यात आले असून, त्याची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किंमत सुमारे सहा कोटी रुपये असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. दरम्यान, पुणे पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकानं केलेल्या कारवाईत सुमारे 27 किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आले असून त्याची किंमत साडेपाच लाख रुपये आहे. या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.